# मराठी कवितेत उमटलेले जागतिकीकरणाचे प्रतिबिंब

**लता सुधीर कदम**

मराठी विभाग, श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259593

## ABSTRACT:

साहित्य हा समाजमनाचा आरसा असतो, हे आपण वारंवार ऐकत आलो आहोत. समाजात घडणाऱ्या सर्व बऱ्यावाईट घटनांचे पडसाद साहित्यात उमटतात. सभोवताली घडणारे बदल साहित्यावर प्रभाव टाकतात. जागतिकीकरण ही माणसाच्या जगण्यात आणि विचारात अमूलाग्र बदल घडवणारी घटना आहे. मानवी आयुष्याला जागतिकीकरणाने व्यापले आहे. प्रत्येक क्षेत्रात जागतिकीकरणाचा शिरकाव झाला आहे. शांत, संयमी आणि समाधानी आयुष्य जगणाऱ्या सर्वसामान्य कष्टकरी माणसाचे जीवन जागतिकीकरणाने ढवळून निघाले. त्याच्या क्षमतेबाहेरची, आकलनाबाहेरची आणि जगण्याबाहेरची ही गोष्ट त्याला अपरिहार्यता म्हणून स्वीकारावी लागली. तर शहरी माणसाने गरज म्हणून ती स्वीकारली. जागतिकीकरणाचा झगमगाट हा वरवरचा भुलभुलय्या आहे, हे कळण्यासाठी काही वर्षे जावी लागली. आज मात्र जागतिकीकरणाचे घातक परिणाम ठळक होऊ लागले आहेत. गावखेडी, शेतीमाती, उद्योगधंदे, कला, साहित्य, राजकारण आणि समाजकारण अशी सर्वच क्षेत्रे जागतिकीकरणाने प्रभावित झाली आहेत. सुखाच्या संकल्पना बदलल्या आहेत. जीवनमूल्ये बदललेली आहेत. समूहभान नष्ट होऊन आत्मकेंद्री, चंगळवादी वृत्ती फोफावली आहे. याचा परिणाम म्हणून आयुष्यातील आनंदच हरवला आहे. जगण्याच्या या पडझडीचे प्रतिबिंब मराठी कवितेत ठळकपणे पडलेले दिसते.

## KEYWORDS:

जागतिकीकरण, मराठी कविता, शेतकरी, ग्रामसंस्कृती, जीवनमूल्ये.

जागतिकीकरण ही एका रात्रीत उदयास आलेली गोष्ट नाही. विकसित देशांमध्ये तिचा उगम झाला. तंत्रज्ञानाच्या स्वरुपात भारतासारख्या विकसनशील देशात सर्वप्रथम जागतिकीकरण अवतरले. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे इथल्या शेतीव्यवस्थेवर जागतिकीकरणाचे उमटलेले पडसाद पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. याचे ठळक उदाहरण म्हणून आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबरीकडे पाहता येईल. विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' या कादंबरीत आलेले धरणग्रस्त, जयंत नारळीकरांच्या विज्ञानकथा, कृष्णात खोत यांची 'रिंगाण' ही कादंबरी तसेच वसंत आबाजी डहाके यांचा 'चित्रलिपी' हा कवितासंग्रह अशा अनेक साहित्यकृतींमध्ये जागतिकीकरणाने प्रभावित झालेल्या माणसांच्या भावविश्वाचे अनेक पैलू उलगडण्यात आले आहेत.

याबद्दल ज्येष्ठ साहित्यिक डॉ. मोहन पाटील म्हणतात, 'जागतिकीकरणाच्या प्रभावी शस्त्राचा मोठ्या हिकमती वापरामुळे सर्व जगाचे केंद्र पैसा, श्रीमंती हेच ठरवून टाकलं. म्हणजे सर्व विश्वाचे केंद्र माणूस आहे किंवा ही पृथ्वी शेषाच्या फणीवर नसून ती कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरली आहे या महत्त्वाच्या सिद्धांतालाच पूर्णविराम मिळाला.'

जागतिकीकरणाच्या काळात गावगाडा उधळला गेला असल्याची भावना डॉ. पाटील यांनी व्यक्त केली आहे.

मराठी कवितेत उमटलेले जागतिकीकरण सांगताना प्रवीण दशरथ बांदेकर यांनी मांडलेला विचार महत्त्वाचा वाटतो.त्यांच्या मते, 'जागतिकीकरणाच्या अपरिहार्य परिणामामुळे बदललेली मूल्यसंवेदना व्यक्त करणारी कविता ही जागतिकीकरणाची कविता आहे.'पुढे ते म्हणतात, 'जागतिकीकरणामुळे समकालीन जीवन व्यवहारात जाणवू लागलेली पडझड, सामाजिक व सांस्कृतिक जीवनातली विसंगत व मूल्यव्यवहारातील घुसळण वर्तमानाच्या परिभाषेत पकडून पाहणारी ही कविता आहे.'

अनेक कवींनी आपल्या कवितेत जागतिकीकरण पकडण्याचा व प्रभावीरीत्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिकीकरणाची अभ्यासपूर्ण मांडणी करून त्याच्या परिणामांची गंभीरता ठळक केली आहे. जागतिकीकरणाचा प्रभाव मराठी कवितेवर ठळकपणे पडला

असल्याचे दिसते. ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ, इंद्रजीत भालेराव, श्रीकांत देशमुख, वीरधवल परब, बालाजी मदने इंगळे, कल्पना दुधाळ, रावसाहेब कुवर, ऐश्वर्य पाटेकर अशा अनेक कवींनी जागतिकीकरणाचे गावगाड्यावर झालेले परिणाम आपल्या कवितेतून अधोरेखित केले आहेत. या कवींच्या रचनांमधून जागतिकीकरण गडद होते.

जागतिकीकरणाने हतबलता येते. गावगाड्यातील परंपरेला धरून असलेली, रुळलेल्या रुढी आणि जीवनपद्धतीला सरावलेली, स्वतःला सुरक्षित समजणारी पिढी अचानक आलेल्या या जागतिकीकरणाने भांबावून गेली. त्यांच्या जगण्यावर दूरगामी परिणाम झाले. जागतिकीकरणाचा शेतीवर पडलेला प्रभाव लक्षणीय आहे. संपूर्ण शेतीव्यवस्था जागतिकीकरणाने ढवळून निघाली. तंत्रज्ञानाच्या काळात हतबल झालेला शेतकरी ना. धों. महानोर यांच्या कवितेत असा प्रकट होतो

**‘सगळ्यांचेच आता दिवाळं निघालेलं**
**कोरड्या दुष्काळात**
**कुणाला सांगावं देश मोडून चाललाय**
**शेतीभातीचा, हा खेड्यापाड्यांचा देश**
**उदास होत चाललाय**
**आम्हाला काहीच कसं करता येत नाही**
**ह्या कॉम्प्युटरच्या जगात’**

जागतिकीकरणही वरवर पाहता सुखावह वाटणारी गोष्ट असली तरी प्रत्यक्षात मात्र तिने नवे प्रश्न निर्माण केले. कुणब्याच्या वाट्याला दुःख दिले. संगणकाच्या युगात शेतकरी दीनवाना झाला. खेड्यापाड्यांचा देश उदास होत असल्याचे दुःख इथे महानोर मांडतात.

जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांचे आयुष्य सुखी होईल असे भासवले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र त्याच्या आयुष्यात नवे प्रश्न निर्माण झाले. या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कामअनेक कवींनी केले. हरितक्रांती शेतकऱ्यांच्या आयुष्यात आली ती जागतिकीकरणामुळेच. या हरितक्रांतीसोबत धवलक्रांती आली. या धवलक्रांतीचा खरा चेहरा विठ्ठल वाघ यांनी आपल्या कवितेत उभा केला आहे.

**'आवेग विजेचा ऐसा पाताळ कोरडे होई**
**विहिरी तुडुंब होती रित्याच घागरी काही**
**हरित होतसे क्रांती उच्चांक मोडते पीक**
**कवलारू गवती वस्त्या साम्राज्य मानते भूक**
**वाहते दुधाची गंगा पाहिली कधी ना माय**
**गोकुळ व्हायचे कैसे वासरू कुठे नि गाय'**

जागतिकीकरणामुळे गावातील सुख, समाधान हरवले. दूध उत्पादन वाढले म्हणजे दूध उत्पादक शेतकरी सधन होईल असा भाबडा विश्वास वाटला. पण प्रत्यक्षात तसे घडले नाही. 'गोकुळ व्हायचे कैसे, वासरू कुठे नी गाय' असा प्रश्न त्यांना पडतो. त्यामुळे हरितक्रांती, धवलक्रांती हे फसवे चित्र असल्याचे स्पष्ट होते.

जागतिकीकरणामुळे गावगाडा निखळून पडला. कुणब्याचे आयुष्य उध्वस्त झाले. परिणामी शेती उद्ध्वस्त झाली असल्याचे प्रखर वास्तव इंद्रजीत भालेराव यांनी आपल्या कवितेत मांडले आहे. यांत्रिकीकरण हा जागतिकीकरणाचाच भाग आहे. शेतातील कामे यंत्रामुळे सोपी झाली. उत्पादन वाढले. शेतीतील कामांना लागणारा वेळ वाचला असे वाटू लागले परंतु प्रत्यक्षात मात्र शेतकरी आत्महत्या घडू लागल्या.

जोपर्यंत गावात जागतिकीकरणाचा प्रवेश झाला नव्हता तोपर्यंत आत्महत्याही होत नव्हत्या. हा विचार मांडताना भालेराव म्हणतात,

**'शेती उद्ध्वस्त झाली ती जागतिकीकरणामुळेच**
**आत्महत्येचा शिरकाव गावात झाला तो जागतिकीकरणामुळेच'**

जागतिकीकरणाचे हे भयानक वास्तव भालेरावांच्या कवितेत दिसते.मरणाच्या दारात गावाला आणून उभं करण्यात जागतिकीकरणाचा वाटा मोठा आहे. सामान्य कष्टाळू माणसाच्या आयुष्यातील आनंद जागतिकीकरणामुळे हरवला आहे. हे मांडताना ते म्हणतात,

**'जागतिकीकरणाच्या एंड्रीनचा डब्बा**
**कुणी धुतला माझ्या निर्मळ गंगेत**
**निरागस विहार करणाऱ्याच्या नाकात**
**कुणी आणून कोंबला अचानक आकांत'**

यावरून कुणब्याचे आयुष्य भकास करणारे जागतिकीकरण काय कामाचे? असा प्रश्न आपल्याला पडतो. नाईलाजाने जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यावर शेतकऱ्यांची होणारी ससेहोलपट भालेराव टोकदारपणे व्यक्त करतात. जागतिकीकरणाच्या रेट्यात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी ‘कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक’असा मंत्र ते कवितेतून देतात. जागतिकीकरणाच्या रेट्यात टिकून राहायचं असेल तर लढण्याला पर्याय नाही हे सांगण्याचा प्रयत्न कवी करतात.

बालाजी मदन इंगळे यांच्या कवितांमध्ये जागतिकीकरण तंत्रज्ञानाची भाषा घेऊन अवतरते. ‘इंटरनेट’,‘कम्प्युटर’,‘कव्हरेज’ असे शब्द त्यांच्या कवितेत सातत्याने येतात. ‘मेलं नाही अजून आभाळ’ या कवितासंग्रहात त्यांनी जागतिकीकरणाचा ऊहापोह केला असल्याचे दिसते. ते म्हणतात,

**‘कष्ट, वेदना**
**बैलांसोबतचा नांगरटीतला युगांचा प्रवास**
**इंटरनेटवर**
**अपलोड करावा म्हणतो’**

तंत्रज्ञानाच्या काळातील शेतीचे हे वास्तव कवीने येथे मांडले आहे. या तंत्रज्ञानाचा समाचार घेताना ‘मेमरीकार्ड’या कवितेतOne GB किंवा Two GB मेमरी असे शब्दप्रयोग करून कवी तंत्रज्ञानाचे वास्तव मांडतात. याच तंत्रज्ञानाने होरपळलेल्या शेतकऱ्याची व्यथा मांडताना,

**‘मोबाईल की पॅडवर बोटं फिरवून**
**पाठवता येतो SMS**
**हव्या त्या व्यक्तीला वाट्टेल तसा**
**पण कुळव नांगर खुरपण पेरा**
**सगळी बटणं दाबून SMS टाईप केला**
**तरी बापाच्या कपाळाच्या स्क्रिनवर Sending Faillure’**

बापाचं कम्युनिकेशन या कवितेत जागतिकीकरणाची दुखरी बाजू मांडताना ते म्हणतात,

**‘कॉम्प्युटरचं बटण दाबताच**

**लख्ख उजळून निघावं सारं जग**
**तसं वंधाऱ्यावर पाय ठेवताच**
**समोर दिसू लागतं**
**बापाचं उघडंनागडं जग'**

या कवितेत जागतिकीकरणाचे फसवे चित्र आणि कुणब्याचे आयुष्य यातील फरक मांडला आहे. उपहासाची, उपरोधाची भाषा कवितेत आली आहे. जागतिकीकरणाचा प्रभाव संपवता येत नाही. भोवताली पसरलेला कोलाहल, अस्वस्थता कवी पोटतिडकीने कवितेत मांडतात.प्रत्येकाचा अस्तित्वासाठी संघर्ष सुरू आहे. मूल्यांचा ऱ्हास होतो आहे. भ्रष्टाचारामुळे माणूस त्रस्त आहे. जाती धर्मावरून समाजात टोकाची दुही माजली आहे. त्यामुळे सुखी, समाधानी आयुष्य हरवलं आहे. या हरवलेपणाची गोष्ट अनेक कवींनी आपल्या कवितेत मांडली आहे. संवेदनशील माणसाला हादरवून टाकणारी ही गोष्ट आहे.

या जागतिकीकरणाविषयी पी. विठ्ठल लिहितात, 'जागतिकीकरण ही एक अपरिहार्य अशी घटना आहे. त्याचे अस्तित्व आपण आता पुसून टाकू शकत नाही. माणसाच्या सर्वांगीण आर्थिक प्रगतीला जसा याचा हातभार लागला आहे, तसाच माणसाच्या भावनिक आणि मानसिकतेला ही मुळातून धक्का बसला आहे. या धक्क्याचे स्वरूप भिन्न भिन्न असले तरी सामाजिक स्थित्यंतरावर याचा खूप मोठा परिणाम झाला आहे. शेती, व्यापार आणि शिक्षण ही क्षेत्रे थेटपणे यात सामावली आहेत. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक शोषणाचे जागतिकीकरण हे एक नवे केंद्र बनले आहे.'

जागतिकीकरणाचे ताणेबाणे मांडताना अंतर्मुख करायला लावणाऱ्या कविता लिहिणारे महत्त्वाचे कवी म्हणून रावसाहेब कुवरयांचे नाव समोर येते. जागतिकीकरणाचा आढावा घेताना कवी कमालीचा अस्वस्थ होतो. जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून गावे ओस होत आहेत. गाव सोडून शहरात धाव घेणाऱ्या शेतकऱ्यांची अवस्था मांडताना ते म्हणतात,

**'त्यादिवशी**
**पुन्हा एक शेतकरी संपला**
**त्याच्या अवस्थेमुळं**

**की इथल्या व्यवस्थेमुळं माहीत नाही'**

जागतिकीकरणाच्या प्रभावाने शेतीव्यवस्था मोकळीस आली असल्याचे शल्य कवी व्यक्त करतात. गाव संपण्याची, शेतकरी संपण्याची आणि पर्यायाने कष्टकरी माणूस संपण्याची घातक प्रक्रिया जागतिकीकरणाच्या माध्यमातून सुरू झाल्याचे सुतोवाच कवितेतून कवी करतो. जागतिकीकरणाने शेती व्यवस्थेत आलेला फोलपणा, सामान्य माणसाचे भरडले जाणे, हतबल होणे कुवर प्रभावीरित्या मांडतात. जागतिकीकरणाने गाव उद्ध्वस्त होण्याच्या भयंकर संकटाची ही नांदी आहे असे त्यांना वाटते. एका कवितेत ते म्हणतात,

**'गाव जगू देत नाही**
**शहर तगू देत नाही**
**हा ग्लोबल नावाचा कोळी**
**टाकून बसला आहे जाळी**
**अडकून जिच्यामध्ये**
**फडफडते आहे अख्खी पिढी**
**जुन्या पिढीच्या तडफडीसह'**

गाव जगू देत नाही आणि शहर तगू देत नाही ही अगतिकता कुवर मांडतात.जागतिकीकरणाच्या काळात शेतकऱ्याची होणारी आर्थिक लूट मोठी आहे. अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला मदतीच्या नावाखाली पतसंस्था कशा लुबाडतात याचे वर्णन वीरधवल परब यांच्या कवितेत येते.

**'फार काही नको**
**तुमच्या सुपीक दुआब जमिनी तेवढ्या तारण ठेवा**
**आम्ही काही कोठे पळून जातो होय?**
**शेवटी तुम्हालाच तर त्या कसायच्या आहेत निरंतर'**

गाळात चाललेल्या शेतकऱ्याला आणखीनच गाळात घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या अर्थकारणाचा खरा चेहरा कवी दाखवतो.

अनेक कवींनी जागतिकीकरण कवितेत मांडले आहे. येथे काही प्रातिनिधिक कवितांचा विचार करण्यात आला आहे. जागतिकीकरणामुळे चंगळवाद बोकाळला. नवी मूल्ये अस्तित्वात आली. नातेसंबंधात

ताणतणाव निर्माण झाला. बेफिकिरीची वृत्ती आली. माणसाचे जगणेच बदलले. लोकसंस्कृतीवर, लोकव्यवहारावर जागतिकीकरणाचे प्रतिबिंब उमटले.प्रत्येक कवीची शैली स्वतंत्र असते. जागतिकीकरणाचे विविध पैलू अनेक कवींनी आपल्या कवितांमध्ये उलगडले आहे. प्रत्येकाची भाषाशैली आणि अविष्कार पद्धती वेगवेगळी आहे. तरीही जागतिकीकरणाचे तीव्र परिणाम चिमटीत पकडण्याचा प्रयत्न कवींनी केला आहे. या सर्व कविता जागतिकीकरणाने प्रभावित झालेल्या समाजवास्तवाकडे पाहण्याचा सजग दृष्टीकोन देतात. तसेच आत्मपरिक्षण करण्यास भाग पाडतात. त्यामुळे जागतिकीकरणाची गंभीरता ठळक होते.

**निष्कर्ष:**

1. जागतिकीकरणाचा प्रभाव, परिणाम मराठी कवितेत ठळकपणे मांडले गेले आहेत.
2. ग्रामसंस्कृती, शेती, सामान्य माणूस यांची झालेली पिळवणूक जागतिकीकरणाच्या कवितेत मांडली गेली आहे.
3. कृषिक्षेत्रावर, शेतीव्यवस्थेवर जागतिकीकरणाचा मोठ्या प्रमाणात परिणाम झाला असल्याचे दिसून येते.
4. जागतिकीकरणाने मानवी जीवनमुल्यांचा ऱ्हास होत असून स्वकेंद्रित जीवनशैली आकाराला आली आहे.
5. जागतिकीकरणामुळे सामान्य शेतकऱ्यावर आलेली अगतिकता आणि हतबलता मराठी कवितेत अधोरेखित झाली आहे.

## संदर्भग्रंथ:

1. पी., विठ्ठल मराठी कविता समकालीन परिदृश्य, कैलाश पब्लिकेशन्स, छत्रपती संभाजीनगर, प्रथमावृत्ती २०१९
2. पाटील, एकनाथ जागतिकीकरण आणि वर्तमान आव्हाने, (संपा.) नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर, प्रथमावृत्ती २०१७

## साधनग्रंथ:

1. महानोर, ना. धों. प्रार्थना दयाघना, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वि. आवृत्ती १९९२
2. भालेराव, इंद्रजित भुईचे लळासे, आदित्य प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर, प्रथमावृत्ती २०२३
3. वाघ, विठ्ठल मातीचा झरतो डोळा, सारांश प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती २०१३
4. कुवर, रावसाहेब हरवल्या आवाजाची फिर्याद, काव्याग्रह प्रकाशन, वाशिम, प्रथमावृत्ती २०१७
5. परब, वीरधवल मम म्हणा फक्त, लोकवाड़मय गृह प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, २०१६
6. ६) इंगळे, बालाजी मदन मेलं नाही अजून आभाळ, लोकवाड़मय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती २०१०

**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.